जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/२८२८/२०२३

## वाहतुक नियंत्रण अधिसुचना

दिनांक ०७ /०६/२०२३

मारुंजी वाय जंक्शन, भुमकरचौक, काळाखडक याठिकाणा वरुन हिंजवडी आय.टी.पार्क मध्ये जाणा-या व येणा-या वाहनांची संख्या वाढली असुन सध्या मेट्रोचे काम सुरु असल्याने व मारुंजी वाय.जंक्शन याठिकाणी हेवी व्हेइकलला यु टर्न घेण्यासाठी रस्ता अपुरा पडत असल्याने वाहतुक कोंडी निर्माण होते.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी काकासाहेब डोळे, पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

### वाकड वाहतुक विभाग अंतर्गत

| अ.क्र. | ठिकाण |
|---|---|
| १. | मारुंजी वाय जंक्शन येथील उजवी कडील यु टर्न बंदकरुन लक्ष्मी चौकाकडे जाणारी वाहतुक कस्तुरी चौक मार्गे विनोदे कॉर्नर येथुन इच्छित स्थळी जाऊ शकते. |
| २. | मारुंजी वाय जंक्शन ते कस्तुरी चौक एकेरी वाहतुक करण्यात येत आहे. |
| ३. | कस्तुरी चौकाकडुन मारुंजी वाय जंक्शनकडे येणारी वाहतुक बंद करुन ती कस्तुरी चौकातुन विनोदे कॉर्नर मार्गे मारुंजी वाय जंक्शनकडे वळविण्यात येत आहे. |

तरी वरील प्रमाणे वाकड वाहतुक विभाग अंतर्गत वाहतुक बदलाबाबतची अधिसुचना (नोटीफिकेशन) काढण्यात येत असुन नागरीकांनी वरील प्रमाणे मार्गाचा वापर करावा

सदरचे अधिसुचना अमंलबजावणी ०८/०६/२०२३ पासुन करण्यात येत आहे.

(काकासाहेब डोळे)
पोलीस उप-आयुक्त,परि२
अति. कार्य वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी वाकड वाहतुक विभाग,

४) कार्यकारी अधिकारी, ड क्षेत्रिय कार्यालय, पिंपरी चिंचवड
/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with CamScanner